**<u>शुल्क आदा करणे यासाठी मार्गदर्शक सूचना</u>**

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद

व्हर्जन V1.0 दि. १०ऑक्टोबर २०१८

<u>ऑनलाईन फी भरण्यासाठी मार्गदर्शक सूचना</u>

ऑनलाईन रजिस्ट्रेशनकरीता अर्ज करण्यापूर्वी अर्जदाराने प्रथम मार्गदर्शक सूचना वाचून समजून घ्याव्या. नोंदणी व इतर शुल्क भरण्यासाठी SBI Portal चा वापर करावा. लिंक पुढीलप्रमाणे :-
https://www.onlinesbi.com/sbicollect/icollecthome.htm?corpid=845584

- अर्जदारानी योग्य ठिकाणी आपली संपूर्ण माहिती ऑनलाईन पंजीकरण अर्जात काळजीपूर्वक भरावी. अर्जदारास एकाचवेळी संपूर्ण माहिती भरता आली नाही किंवा त्यास /तिस भरलेली माहिती तपासून पहावयाची असल्यास ती जतन करता येईल. माहिती जतन झाल्यावर संगणक प्रणालीद्वारे लॉग-इन आयडी आणि पासवर्ड तयार होईल व तो स्क्रिनवर दिसेल. अर्जदारानी लॉग-इन आयडी आणि पासवर्डची नोंद करून घ्यावी. सदर लॉग-इन आयडी आणि पासवर्ड ई-मेल आणि एस्.एम्.एस् द्वारा अर्जदारास कळविण्यात येईल. लॉग-इन आयडी आणि पासवर्डचा वापर करून अर्जदारास आवश्यक असल्यास माहिती अद्ययावत करता येईल. संपूर्ण माहिती बरोबर भरली असल्याची खात्री करून घ्यावी आणि सबमीटचे (submit) बटण दाबावे.
- अर्ज पूर्ण भरल्यावर आणि आवश्यक कागदपत्रांच्या प्रती अपलोड केल्यावर अर्जदाराने ( Proceed for payment ) या ऑनलाईन ॲप्लीकेशनमधील शेवटी असलेल्या बटणावर क्लिक करावे.
- अर्जदाराने ( Proceed for payment ) या बटणावर क्लिक करण्यापूर्वी एकदा संपूर्ण माहिती भरली असल्याबाबत खातरजमा करावी. **<u>ऑनलाईन अर्ज सादर झाल्यावर कोणताही बदल करता येणार नाही.</u>**
- अर्जाच्या प्रकारानुसार भरावयाच्या शुल्काचा संपूर्ण तपशिल दिसेल. अर्जदाराने SBI Portal एकूण किती शुल्क भरावयाचे आहे याची नोंद घ्यावी.
- Payment details page वरभरावयाच्या शुल्काचा संपूर्ण तपशिल दिसेल. अर्जदाराने SBI Portal एकूण किती शुल्क भरावयाचे आहे याची नोंद घ्यावी.
- (Pay) बटणवर क्लिक केल्यावर SBI Portal वर आपोआप जाल. पुढील सूचनांचे अनुपालन करून शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण करा
- अर्जदाराने स्क्रिनवर दिसत असलेल्या सर्व अटी-शर्ती मान्य केल्या पाहिजेत. चेंक बॉक्सवर क्लिक करा व पुढे जा.
- आता परिषदेचा लोगो, नांव आणि पत्ता दिसेल.
- Registration Fee हा पर्याय निवडा.
- अर्जदाराने स्वतःचे नांव , जन्मतारिख, मोबाईल क्रमांक , ई-मेल , रजिस्ट्रेशन फी रक्कम ही माहिती भरावी.
- स्क्रिनवर विचारलेली माहिती देऊन मास्टर / व्हिसा डेबिट किंवा क्रेडीट कार्ड अथवा इंटरनेटद्वारे शुल्क जमा करावे.

- शुल्क भरण्याची प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण झाल्यानंतर दहा अंकी संदर्भ क्रमांक प्राप्त होईल. पुढील कामकाजासाठी हा संदर्भ क्रमांक नोंद करावा. (उदा. DUXXXXXXXX)
- शुल्क भरण्याची प्रक्रिया व्यवस्थित पूर्ण न झाल्यास "your online transaction was unsucceseful. Please repeat the process again until Reference number is generated" असा मेसेज येईल. वरील प्रक्रिया संदर्भ क्रमांक येईपर्यन्त पुन्हा करावी.
- शुल्क भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाल्यावर ई-रिसीट तयार होईल.
- ई-रिसीटचे प्रिन्ट घ्या.
- ई-रिसीट तयार झाल्यावर , अर्जदाराने http://online.mspcindia.org वर लॉग-इन करावे व पेमेन्ट डिटेल्स भरावे.
- अर्जदाराला संगणक प्रणालीद्वारे पेमेन्ट डिटेल्स या विभागाकडे निर्देशित केल्यानंतर पेमेन्ट डिटेल्सबाबत संदर्भ क्रमांक , फीची रक्कम इ. तपशील भरण्याची मागणी केली जाईल.
- शुल्क आदा केल्यानंतर संगणक प्रणालीद्वारे अर्जदारास त्याच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी परिषद कार्यालयातील भेटीचा दिवस निश्चित करण्याच्या विभागाकडे निर्देशित केल्यानंतर त्याने त्याच्या सोयीने निवड करावी.

टिप : पेमेन्टची माहिती भरल्यानंतर ऑनलाईन ॲप्लीकेशन फॉर्म सबमीट केल्यावर सर्व्हरकडून पुढील माहिती येईपर्यन्त वाट पहा, दुप्पट शुल्क भरणा टाळण्यासाठी कोठेही बॅक , रिफ्रेश बटन प्रेस करू नये.

अर्जदाराने पेमेन्ट डिटेल्समध्ये दर्शविल्याप्रमाणेच शुल्क जमा करावयाचे आहेत अन्यथा अर्ज रद्द होईल किंवा पुन्हा माहिती भरण्यासाठी मागे जाईल व त्यामुळे पुढील कार्यवाहीस उशीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

फी दरपत्रक :

| तपशिल | शुल्क |
|---|---|
| अर्ज शुल्क (फॉर्म फी) | रु. २५/- |
| पंजीकरण फी (रजिस्ट्रेशन फी) | रु. १००/- |
| पोस्टेज | रु. १००/- |
| फार्मासिस्ट प्रोफेशनल प्रोफाईल चार्जेस | रु. २००/- |
| सेवा आकार | रु. ५००/- |
| डीआयसी पब्लिकेशन्स (ऐच्छिक) | रु. २५०/- |
| अतिरिक्त शैक्षणिक अर्हता शुल्क लागू असल्यास (प्रत्येक वाढीव अर्हतेसाठी) | रु. ५०/- |
| नावात बदल (लागू असल्यास) | रु. २०/- |
| पंजीकरण नुतनीकरणासाठी - महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम १९६९ नुसार अर्जदार पंजीकरण नुतनीकरणासाठी आगाऊ शुल्क भरू शकतो ( Advance Renewal Fees in lump sum- ARFL).<br><br>सध्या पंजीकरण नुतनीकरण शुल्क एक वर्षासाठी रु.५०/- आहे. भविष्यात फी वाढ झाल्यास ARFL शुल्कामध्ये बदल संभवतो. | |